# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्सः२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बॅंक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


क्रमांक:- एमआयएस-०६१८/सीआर-६१/२०१८/तीन                                   दिनांक : १५ जानेवारी, २०२१

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**विषय**:- सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाचा दावा केलेल्या उमेदवारांच्या संदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत.

आयोगामार्फत सन २०२० मध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या खालील चार जाहिरातीस अनुसरुन अर्जाद्वारे फक्त सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाचा दावा केलेल्या उमेदवारांना अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यापैकी कोणत्या आरक्षणातून लाभ घ्यावयाचा आहे, याबाबत दिनांक ५ जानेवारी, २०२१ ते दिनांक १५ जानेवारी, २०२१ रोजी २३.५९ वाजेपर्यंत विकल्प निवडण्याची संधी आयोगाकडून देण्यात आली आहे :-

(१) सहायक मोटार वाहन निरीक्षक पूर्व परीक्षा-२०२०
(२) राज्यसेवा पूर्व परीक्षा-२०२०
(३) महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा-२०२०
(४) महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा-२०२०

**२**. आयोगाच्या दिनांक ४ जानेवारी, २०२१ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकानुसार विकल्प निवडण्याकरीता मुदतवाढ देण्यात येत असून संबंधित उमेदवारांना **दिनांक २२ जानेवारी, २०२१ रोजी २३.५९ पर्यंत** विकल्प निवडण्यासंदर्भातील कार्यवाही करता येईल. त्यानंतर वेबलिंक बंद होईल.

**३**. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील उमेदवारांनी उपरोक्त ४ परीक्षांपैकी ज्या परीक्षांकरीता अर्ज केला आहे, त्या प्रत्येक परीक्षेकरीता अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांचा विकल्प निवडावयाचा आहे, त्याकरीता उमेदवारांनी त्यांच्या खात्यामध्ये (Profile) लॉगीन केल्यानंतर पुढीलप्रमाणे प्रक्रिया करावी :-

(१) 'माझे खाते' हा पर्यात निवडा.
(२) 'माझे ॲप्लिकेशन' मधील 'स्पर्धात्मक परीक्षा' या लिंकवर क्लिक करावे.
(३) जाहिरातीचे वर्ष निवडल्यानंतर उपलब्ध होणा-या यादीतील परीक्षा निवडावी.
(४) संबंधित परीक्षेकरीता 'Select Category' वर क्लिक केल्यानंतर अराखीव (खुला) किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यापैकी योग्य पर्याय निवडून सबमिट करावे.

**४**. दिनांक ४ जानेवारी, २०२१ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकामधील अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही.

ठिकाण: मुंबई

सहसचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग